महाराष्ट्र शासन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५

दूरध्वनी क्र ०२०२५५३८८२६ Email ID : diratmams@gmail.com

जा.क्र.कृआ/आत्मा/WDC-२.०/ मा.सु./662/२०२४ दिनांक : 10/०९/२०२४

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,**
**पुणे.**

**विषय:** प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रेरक उपक्रम आणि उत्पादन पद्धती या घटकांच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांबाबत .....

**संदर्भ** - १. मा. प्रधान सचिव, मृद व जलसंधारण यांचे कार्यालयाचे पत्र प्रकृयो२०२३/प्रक्र.५१/जल-८, मृद व जलसंधारण दि.०१/०६/२०२३

२. आपल्या कार्यालयाचे पत्र क्रमांक व.पा.वि.यं/प्र.मं.कृ.सिं.यो.२.०/उपजीविका/FPO/३९५/२३ दि. २३/०८/२०२३

उपरोक्त विषयांन्वये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांची अंमलबजावणी आत्मा यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे. उपरोक्तप्रमाणे संदर्भ क्र.१ व २ अन्वये सदर घटकांची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर करणेकरिता आवश्यक मार्गदर्शक सूचनांना मान्यता प्राप्त झालेली आहे.

प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांची अमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणीमुळे मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करणेबाबत क्षेत्रीय पातळीवरून वारंवार मागणी करण्यात येत होती. सदरची बाब विचारात घेवून योजनेच्या प्रभावी अमलबजावणीसाठी यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अंशतः बदल करणे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने तयार करण्यात आलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांचा मसुद्यास आवश्यक ती मान्यता घेणेबाबत आपले स्तरावरून उचित कार्यवाही होणेची, विनंती आहे.

**सोबत:** प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धतीया घटकांचा सुधारित मार्गदर्शक सूचनांचा मसुदा

(अशोक किरनळ्ळी)
कृषी संचालक, आत्मा
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे-१.
12 SEP 2024
आ. क्र. ५९८

श्रीम. जगताप
13/9/2024.

<u>सुधारित मार्गदर्शक सुचना</u>

**प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत पाणलोट विकास कार्यक्रम २.० मध्ये प्रवेश प्रेरक उपक्रमाअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या ( FPC ) स्थापन करणेबाबत**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० च्या मार्गदर्शक सुचना मुद्दा क्र. १३.३ नुसार प्रवेश प्रेरक उपक्रमांतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी ( FPC ) स्थापन करण्याचा पर्याय देण्यात आला आहे. निवडलेल्या पाणलोट क्षेत्रात शेतकरी उत्पादक कंपनी ( FPC ) स्थापन करण्यासाठी केंद्र पुरस्कृत Promotion & Formation of 10000 FPO स्थापन करणेबाबत योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रमांतर्गतही शेतकरी उत्पादक कंपनी ( FPC ) स्थापन करता येतील असे सुचीत करण्यात आले आहे.

मा. प्रधान सचिव, कृषि तथा जलसंधारण, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे दि २३.०१.२०२३ रोजी झालेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या आढावा बैठकीच्या इतिवृत्तानुसार आत्मा यंत्रणेमार्फत PMKSY-WDC- 2.0 अंतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रम (EPA) मधुन शेतकरी उत्पादक कंपनी ( FPC ) स्थापन करणेबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच, प्रवेश प्रेरक उपक्रम अंतर्गत प्रकल्पाच्या किमतीच्या २ टक्के निधी संबंधीत जिल्ह्याच्या आत्मा संस्थेकडे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जिल्हानिहाय आत्मा यंत्रणेकडे वितरीत निधीचा तपशील **"प्रपत्र अ"** नुसार आहे.

केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण विभागाच्या Promotion & Formation of 10000 FPO या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रति शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) वेगवेगळ्या घटकासाठी खर्चाचे मापदंड खालीलप्रमाणे आहेत.

१. **कार्यान्वयन यंत्रणा ( Implementing Agency – IA)– एकुण खर्चाच्या ५ टक्के**

३ टक्के आगाऊ स्वरुपात आणि उर्वरीत २ टक्के कामाच्या मुल्यमापनानंतर

२. **समुह आधारीत व्यवसायिक संस्था (Cluster Based Business Organization – CBBO)**

प्रति शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) अधिकतम रु.२५.०० लाख किंवा शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करुन त्यांना सहाय्य करणेसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते.

३. **शेतकरी उत्पादक कंपनी** (FPC) **व्यवस्थापन खर्च**–

प्रति शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) अधिकतम रु.१८.०० लाख किंवा प्रत्यक्ष येणारा खर्च यापैकी जे कमी असेल ते अशा रीतीने वरील अनु. क्र. २ व ३ साठी अधिकतम रु.४३.०० लाख आणि त्यावर अनु. क्र. १ साठी (५ टक्के प्रमाणे) रु.२.१५ लाख असे एकुण रु.४५.१५ लाख इतका अधिकतम खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त अनु.क्र. १ ते ३ च्या खर्चाचे प्रमाण खालीलप्रमाणे येते.

| अ. क्र. | बाब | अधिकतम खर्च ( रु. लाख) | खर्चाचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १ | कार्यान्वयन यंत्रणा (Implementing Agency - IA) | २.१५ | ५ |
| २ | समुह आधारीत व्यवसायिक संस्था (Cluster Based Business Organization - CBBO) | २५.०० | ५५ |
| ३ | FPC व्यवस्थापन खर्च | १८.०० | ४० |
| | एकुण | ४५.१५ | १०० |

Promotion & Formation of 10000 FPO योजनेत शेतकरी उत्पादक कंपनी ( FPC ) स्थापन करणेसाठी उपरोक्तप्रमाणे मापदंड असले तरी प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रवेश प्रेरक उपक्रमांतर्गत प्रकल्प खर्चाच्या २ टक्केनुसार उपलब्ध होणारे अनुदान यापेक्षा कमी असणार आहे. ही बाब लक्षात घेऊन तसेच, आत्मा यंत्रणेमार्फत राबविलेल्या जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (MACP) आणि मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) या प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा अनुभव लक्षात घेऊन FPC स्थापन करणेसाठी आत्मा कॅफेटेरीयाच्या धर्तीवर खालीलप्रमाणे कॅफेटेरीया देण्यात येत आहे. या कॅफेटेरीयातुन प्रति पाणलोट प्रवेश प्रेरक उपक्रमासाठी उपलब्ध निधीतुन आवश्यक बाबी राबवुन शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करावेत किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) चे बळकटीकरण करावे.

**<u>क्रियाकलपाचे घटक</u>** ( Cafeteria of Activities)-

| अ. क्र. | बाब | मापदंड | प्रति FPO / FPC अधिकतम खर्च मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | शेतकरी गटांची स्थापना व प्रशिक्षण ( प्रति गट २० शेतकरी ) | प्रति गट रु.५०००/- मर्यादेत (अधिकतम २५ गटांसाठी) | रु.१,२५,०००/- |
| २ | FPO ची FPC म्हणुन कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी खर्च | रु.४००००/-प्रति FPC | रु.४०,०००/- |
| ३ | FPC संचालक, प्रवर्तक किंवा प्रकल्पात महत्वाची भूमिका बजावणारे निवडक भागधारक आणि सचिव यांचे प्रशिक्षण आणि अभ्यासदौरा | प्रति व्यक्ती प्रति दिन अधिकतम रु.३,०००/- | रु.१,८०,०००/- |

| अ. क्र. | बाब | मापदंड | प्रति FPO / FPC अधिकतम खर्च मर्यादा |
|---|---|---|---|
| ४ | सनदी लेखापाल शुल्क | प्रति वर्ष रु. १०,०००/- (३ वर्षासाठी) | रु.३०,०००/- |
| ५ | कंपनी सेक्रेटरी शुल्क | प्रति वर्ष रु.१०,०००/- (३वर्षासाठी) | रु.३०,०००/- |
| ६ | पुरक भाग भांडवल अनुदान | प्रति हेक्टर रु. १०००/- | रु.५,००,०००/- |
| ७ | FPC कार्यालयासाठी भाडे तत्वावरील इमारतीचे भाडे | रु. ४०००/-प्रतिमहा प्रमाणे (३६ महिन्यासाठी) | रु.१,४४,०००/- |
| ८ | FPC कार्यालयासाठी युपीएस, इन्वर्हटर, विद्युत उपकरणे आणि वीजबील | ३ वर्षासाठी एकुण रु. ५०,०००/- | रु.५०,०००/- |
| ९ | बैठक व्यवस्था (टेबल, खुर्च्या, सतरंजी, फर्निचर इ.) फक्त एकदा | रु. ५०,०००/- | रु.५०,०००/- |
| १० | संगणक संच, प्रिंटर इ. फक्त एकदा | रु.७०,०००/- | रु.७०,०००/- |
| ११ | सचिवाचे मानधन (मोबाइल व इंटरनेट सुविधेसह) | प्रति महा रु. ५०००/ - प्रमाणे (३६महिन्यासाठी) | रु.१,८०,०००/- |
| १२ | कार्यालयीन खर्च (स्टेशनरी, सफाई, प्रवास खर्च इ.) | प्रति महा रु. ५०००/ - प्रमाणे (३६महिन्यासाठी) | रु.१,८०,०००/- |
| | एकुण | | रु.१५,७९,०००/- |

टिप - यापूर्वी राज्य स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचानांमधील क्रियाकलपातील मुद्दा क्र .७.२ नुसार शेतकरी सामुहीक सेवा सुविधा केंद्राचे बांधकाम (जागेची किंमत वगळुन) करण्यासाठी रु. ७,५०,०००/-रकमेची तरतुद शेतकरी उत्पादक कंपनीसाठी ठेवण्यात आली होती. तथापि या योजनेच्या केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सूचनामधील मुद्दा क्र.२०.५ नुसार बांधकाम करण्यास मान्यता नसल्यामुळे सदरचा मुद्दा क्रियाकलपातून वगळण्यात आला आहे.

प्रवेश प्रेरक उपक्रमासाठी उपलब्ध तरतुदीमधून कॅफेटेरीयातील बाबी राबवुनही रक्कम शिल्लक राहत असल्यास आत्मा योजनेच्या कॅफेटेरीयातील मापदंडानुसार शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) भागधारकांसाठी समूह आधारित कृषि विस्तार कार्यक्रमावर खर्च करावा.

पाणलोट क्षेत्रातील गावात नवीन शेतकरी उत्पादक कंपनी ( FPC ) स्थापन न करता यापुर्वीच अस्तित्वात असलेल्या शेतकरी उत्पादक कंपनीला बळकट करावे असा निर्णय पाणलोट समितीने घेतल्यास त्या कंपनीसाठी वर नमुद कॅफेटेरीयातील आवश्यक बाबीवर मापदंडानुसार खर्च करण्यास हरकत नाही किंवा आत्मा योजनेच्या कॅफेटेरीयातील मापदंडानुसार FPC भागधारकांसाठी समूह आधारित कृषि विस्तार कार्यक्रमावर खर्च करता येईल. सदरहू खर्च करताना जिल्हास्तरीय समितीच्या (WCDC) मान्यतेने करावा.

पाणलोट समितीच्या मान्यतेने एखादा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावयाचा झाल्यास कमाल रु.५०,०००/- मर्यादेत जिल्हास्तरीय समितीची (WCDC) मान्यता घेवून राबविण्यास हरकत नाही. तथापि,सदर उपक्रमामुळे भागधारकांना कायमस्वरूपी सुविधा/फायदा होणे आवश्यक राहील.

**<u>उपरोक्त कॅफेटेरीयातील बाबी राबविण्यासाठी मागदर्शक सुचना खालीलप्रमाणे-</u>**

**१. शेतकरी गटांची स्थापना व प्रशिक्षण ( प्रति गट २० शेतकरी)-**

**( प्रति गट रु. ५०००/- च्या मर्यादेत अधिकतम २५ गटांसाठी, एकुण रक्कम रु. १,२५,०००/-)**

पाणलोट विकासासाठी निवडलेल्या एका गावातील, एका शिवारातील साधारणत: एकाच प्रकारची पीक पद्धती असलेल्या २० शेतक-यांचा गट संघटित करुन त्यांची बैठक घेऊन, त्यांना गट संघटनाचे महत्व पटवुन देणे, शेतक-यांची यादी करणे, त्यांचे ७/१२ चे उतारे संकलीत करणे, गटाच्या नोंदणीसाठी प्रकल्प संचालक आत्मा यांचेकडे अर्ज करुन नोंदणी करणे, नोंदणी फी अदा करणे, गटाच्या बैठकीचे इतिवृत्त लिहण्यासाठी व अन्य कामासाठी लागणारी स्टेशनरी खरेदी करणे, गटाचे बँकेत खाते उघडणे या बाबींचा खर्च ग्रामस्तरीय कृषि सहाय्यक/ बीटीएम, एटीएम/पाणलोट विकास चमु ( WDT ) यांचेमार्फत करण्यात यावा. यासाठी या ग्रामस्तरीय कर्मचा-यांना प्रतिगट रु. ५०००/- प्रमाणे रक्कम अग्रीम स्वरुपात देण्यात यावी.

अग्रीमाचे समायोजन खालीलप्रमाणे कागदपत्रे घेऊन करावे, याव्यतिरीक्त अन्य पावत्या, कागदपत्रे घेण्याची आवश्यकता नाही.-

१. आत्मा संस्थेकडे गटाची नोंदणी झालेबाबत नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

२. गटाचे बँकेत खाते उघडले बाबत बँक पासबुकाच्या पहिल्या पानाची प्रत.

३. गटावरील खर्चाचा बाबनिहाय तपशील.

४. रु. ५०००/- खर्चाबाबत उपयोगिता प्रमाणपत्र.

# उपयोगिता प्रमाणपत्र

मौजे-.................... तालुका-..................... जिल्हा - ...............................

येथे ....................................................................... या शेतकरी गटाची स्थापना करुन त्याची नोंदणी आत्मा संस्थेकडे करण्यात आली आहे. सदर गटाचा नोंदणी क्रमांक ..................................व दिनांक................................ असून या गटाचे बँक खाते ........................................ बँकेच्या................................शाखेत उघडण्यात आले आहे. या गटाच्या समुह संघटन, प्रशिक्षण आणि अन्य अनुषांगिक बाबीसाठी रु. ५०००/- इतका खर्च करण्यात आला आहे. करिता उपयोगिता प्रमाणपत्र अग्रीम समायोजनासाठी सादर.

(सोबत बाबनिहाय तपशील सादर केला असून योग्य आणि वाजवी आहे.)

**स्थळ -**

**दि. -**

**स्वाक्षरी-**

**(नाव-................................)**

**२. FPO ची FPC म्हणुन कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी करणेसाठीचा खर्च- ( रु.४०,०००/- प्रति FPC)**

वर नमुद केल्याप्रमाणे शेतकरी गटांची स्थापना झाल्यानंतर त्या पाणलोटातील सर्व गट प्रमुख आणि पाणलोट विकास समिती (WDC) यांची संयुक्त सभा प्रकल्प अंमलबजावणी संस्था (PIA) यांनी पाणलोटातील अधिकतम क्षेत्र असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये बोलवावी. या सभेत शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करणेबाबत सविस्तर चर्चा करुन खालील बाबतीत निर्णय घ्यावेत.

- FPC साठी कार्यालय व अन्य सुविधासाठी जागेच्या उपलब्धतेनुसार कंपनी कार्यालय कोठे असावे याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
- प्रति भागधारक, समभाग (Share) रक्कम ठरविणेबाबत निर्णय घेणे तसेच, प्रथम येणा-यास प्रथम संधी या न्यायाने योजनेत उपलब्ध पुरक भाग भांडवल अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेणे.
- संचालक मंडळावरील सदस्य व सचिव यांची निवड करणे. (सचिव शक्यतो कृषि पदवीधारक असावा किंवा कृषि पदविकाधारक असावा.)
- शेतकरी उत्पादक कंपनी स्थापनेसाठी कंपनी सेक्रेटरी / सल्लागाराची निवड करणे.
- उपरोक्तप्रमाणे निर्णयांची नोंद इतिवृत्तात घेऊन कंपनी स्थापनेसाठीचा आवश्यक खर्च आत्मामार्फत संबंधीत PIA, क्षेत्रीय कर्मचारी (WDT) यांच्या मदतीने करण्यात यावा. मुख्यतः हा खर्च कंपनी सेक्रेटरी/सनदी लेखापाल आणि शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणेसाठीची नोंदणी फी या

बाबीवर करावा. तसेच आवश्यकता भासल्यास इतर कायदेशीर बाबींसाठी सदरचा निधी वापरता येईल.

३. **FPC संचालक, प्रवर्तक किंवा प्रकल्पात महत्वाची भूमिका बजावणारे निवडक भागधारक आणि सचिव यांचे प्रशिक्षण आणि अभ्यासदौरा – (प्रति व्यक्ती प्रति दिन अधिकतम रु.३,०००/- याप्रमाणे एकुण रक्कम रु. १,८०,०००/-)**

शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करण्याबरोबरच कंपनी यशस्वीपणे चालविणेसाठी संचालक मंडळ, प्रवर्तक किंवा प्रकल्पात महत्वाची भूमिका बजावणारे निवडक भागधारक आणि सचिव यांची क्षमता बांधणी करणे आवश्यक आहे. शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक व सचिव यांचेबरोबरच प्रवर्तक आणि प्रकल्पात महत्वाची भूमिका बजावणारे निवडक भागधारक यांनाही आवश्यकतेनुसार प्रशिक्षण व अभ्यासदौरा यामध्ये सहभागी करून घ्यावे. प्रशिक्षण व अभ्यासदौऱ्यासाठी आवश्यकतेनुसार १ ते ५ दिवस याप्रमाणे नियोजन करण्यात यावे. सदर घटकासाठी उपलब्ध निधीच्या मर्यादेत १ पेक्षा जास्त वेळा आयोजन करावयाचे असल्यास करता येईल.

समुह संघटन, नेतृत्वगुण विकास, कंपनी कायद्याअंतर्गत कंपनीचे लेखापरिक्षण नियमितपणे करुन त्याचा अहवाल ताळेबंदासह कंपनी निबंधक ( ROC ) यांचेकडे सादर करणे, कंपनीचा व्यवसाय आराखडा तयार करणे (Business Plan), भांडवलाच्या उभारणीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेणे, वित्तीय संस्था / बँका यांचेकडुन कर्जाची उभारणी करणे, भागधारक शेतक-यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाची पर्यायी मुल्यसाखळी विकसीत करुन त्यांच्या निव्वळ उत्पान्नात वाढ करणे आणि अंतिमतः शेतकरी उत्पादक कंपनी यशस्वीपणे चालवणे अंत्यत महत्वाचे आहे.

वरील सर्व बाबींचे प्रशिक्षण संचालक, प्रवर्तक किंवा प्रकल्पात महत्वाची भूमिका बजावणारे निवडक भागधारक आणि सचिव यांना चांगल्या व्यावसायिक संस्थेमध्ये देणे आवश्यक आहे. तसेच त्यांचेसाठी अभ्यासदौ-याच्या माध्यमातुन यशस्वी शेतकरी उत्पादक कंपन्यांना भेटी आयोजित करणे आवश्यक आहे. या बाबीवरचा खर्च आत्मा यंत्रणेमार्फत करण्यात यावा. यासाठी रामेती, वनामती, सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनी इ. संस्थांची मदत घ्यावी.

४. **सनदी लेखापाल शुल्क – (प्रति वर्ष १०,०००/-या प्रमाणे ३ वर्षासाठी एकूण रक्कम रु. ३०,०००/-)**

शेतकरी उत्पादक कंपनी ( FPC )चे वार्षिक लेखे लिहणे व लेखापरिक्षण आणि ताळेबंद यासाठी सनदी लेखापाल यांना द्यावयाच्या सेवा शुल्कासाठी सदरची तरतुद असुन यासाठी रु.१०,०००/- अनुदान शेतकरी उत्पादक कंपनीला देण्यात यावे. शेतकरी उत्पादक कंपनीने सनदी लेखापाल (C.A.) नेमणुकीचा ठराव PIA यांच्या शिफारशीसह सादर करावा. सदरचा खर्च प्रथम शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) पातळीवरुन करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त प्रस्तावानुसार प्रकल्प संचालक आत्मा यांनी प्रतिपूर्ती करावी.

**५. कंपनी सेक्रेटरी शुल्क - (प्रति वर्ष रु. १०,०००/-याप्रमाणे ३ वर्षासाठी एकूण रक्कम रु. ३०,०००/-)**

शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) चे विविध अहवाल कंपनी रजिस्टार ROC कडे सादर करणे आणि अन्य सल्ला व सेवा इ. बाबींसाठी कंपनी सेक्रेटरी सेवा शुल्काची तरतुद करण्यात आली आहे. कंपनी सेक्रेटरी नेमणुकीसाठीचा ठराव शेतकरी उत्पादक कंपनीने PIA यांच्या शिफारशीसह प्रकल्प संचालक आत्मा यांचेकडे सादर करावा.

कंपनी सेक्रेटरीसाठी प्रति वर्ष रु. १०,०००/- (३ वर्षासाठी एकूण रु. ३०,०००/-) अनुदान शेतकरी उत्पादक कंपनीला देय राहील. सदरचा खर्च शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) पातळीवरुन करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त प्रस्तावानुसार प्रकल्प संचालक आत्मा यांनी त्या-त्या वर्षासाठी कंपनी सेक्रेटरी शुल्क वर्ग करावे.

**६. पुरक भाग भांडवल अनुदान - (प्रति हेक्टर रु. १०००/-, अधिकतम अनुदान रु. ५,००,०००/-** प्रति FPC)

शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) आर्थिकदृष्ट्या सक्षम होणेसाठी कंपनीचे स्वत:चे भाग भांडवल पुरेसे असणे आवश्यक आहे. तथापि, शेतक-यांच्या कंपन्या स्थापन करताना ही अडचण येते सदर बाब लक्षात घेऊन पुरक भाग भांडवल या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. केवळ प्रकल्प क्षेत्रातील ज्या शेतक-यांनी समभाग (Share) खरेदी केला आहे. अशा भागधारक शेतक-याला योजनेतुन समभागाच्या प्रमाणात (प्रति समभाग रु.१००/- याप्रमाणे) जास्तीत जास्त रु.१०००/- चे अनुदान पुरक समभाग (Share) खरेदी करणेसाठी देण्यात यावे.

समूह स्तरावर २५ गटांची एक शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करावयाची आहे. अशा कंपनीचे सर्व सभासद ठराविक रक्कम भरून समभाग/शेअर्स खरेदी करतील अशा सभासदांनी खरेदी करावयाच्या शेअर्सची किंमत प्रति शेअर रु.१००/- असेल. एक एकर साठी ४ शेअर्स या प्रमाणे (१० आर. च्या पटीत) एक हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत सभासद शेअर्स खरेदी करु शकतील. एका सभासदाला जास्तीत जास्त १० शेअर्स खरेदी करता येतील. सभासदांचे क्षेत्र १ हेक्टरपेक्षा कमी असल्यास किमान १ शेअर सभासदांनी खरेदी करणे अनिवार्य असेल.

अशा पद्धतीने कंपनी स्थापन झाल्यानंतर आणि सभासदांना शेअर्स वितरीत केल्याची खात्री करून प्रति सभासद १ हेक्टरच्या मर्यादेत आणि प्रति गट २० हेक्टरच्या मर्यादेत वाढीव शेअर खरेदी करण्यासाठी पूरक अनुदान या तरतुदीतून देण्यात यावे.

प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी ( First come first serve ) या तत्वावर जे प्रथम ५०० शेतकरी समभाग (Share) खरेदी करतील त्यांनाच हा लाभ देण्यात यावा. एका समभाग धारकास जास्तीत जास्त रु.१०००/- चेच पुरक भाग भांडवल अनुदान मिळेल. यासाठी समभाग खरेदीदार प्रकल्प क्षेत्रातील असलेबाबत पडताळणी करणेची जबाबदारी पाणलोट सचिव यांची राहील. तसेच

आवश्यकता भासल्यास पूरक समभाग अनुदान मागणीच्या वेळी किमान ५०० समभागधारक प्रकल्प क्षेत्रातील असल्याबाबतचे संचालक मंडळाचे प्रमाणपत्र मागविले जाऊ शकते.

**७. FPC कार्यालयासाठी भाडेतत्वावरील इमारतीचे भाडे रु. ४००० /- प्रतिमहा प्रमाणे (३६ महिन्यासाठी एकुण रक्कम रु.१,४४,०००/-)**

शेतकरी उत्पादक कंपनीच्या कार्यालयासाठी आवश्यक इमारत भाडेतत्वावर घेण्यात यावी. कार्यालय शक्यतो रस्त्यालगत पक्क्या इमारतीमध्ये असावे. कार्यालायाकरिता ग्रामपंचायत मालकीची इमारत असल्यास प्राधान्य देण्यात यावे. त्यासाठी अधिकतम रु. ४०००/- प्रतिमहा असे एकुण ३ वर्षासाठी रक्कम रु.१,४४,०००/- ची तरतुद उपलब्ध करुन देता येईल. यासाठी नोंदणीकृत भाडेकरार (किमान ३ वर्षांसाठी) करणे अनिवार्य असून जास्तीचे भाडे कंपनीला स्वतः भरावे लागेल. कार्यालयाचे भाडे अदायगी शेतकरी उत्पादक कंपनी धनादेश/ बँक खात्यामार्फत करेल. यासाठीची तिमाही अनुदान मागणी शेतकरी उत्पादक कंपनी PIA यांचेमार्फत प्रकल्प संचालक आत्मा यांचेकडे करतील.

**८. शेतकरी उत्पादक कंपनीचे कार्यालयासाठी युपीएस, इन्वर्हटर, विद्युत उपकरणे आणि वीजबील (३ वर्षासाठी एकुण रक्कम रु. ५०,०००/-)**

शेतकरी उत्पादक कंपनीचे कार्यालयासाठी युपीएस, इन्वर्हटर, विद्युत उपकरणे उदा. पंखे, ट्युब, इ. प्रकल्प कालावधीसाठी एकदाच तसेच, ३ वर्षापर्यंतचे विद्युत देयक अदा करणेसाठी या बाबीतुन खर्च करण्यात यावा. विद्युत देयकांची अदायगी प्रथम शेतकरी उत्पादक कंपनीने करावी. यासाठीचे अनुदान शेतकरी उत्पादक कंपनीला आवश्यकतेनुसार मागणी केल्यावर उपलब्ध करुन देण्यात यावे.

शेतकरी उत्पादक कंपनीने विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून विद्युत उपकरणांची खरेदी प्रक्रिया त्यांचे स्तरावरून पूर्ण करावी. सदर विद्युत उपकरणांची खरेदी नामांकित कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून करावी. यासाठी बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या नविनतम आवृत्तीची (Latest Version) निवड करावी. खरेदी प्रक्रिया पुर्ण झालेनंतर शेतकरी उत्पादक कंपनीने खरेदीच्या मुळ देयकांसह अनुदान मागणी प्रस्ताव प्रकल्प संचालक आत्मा यांना सादर करावा. प्राप्त प्रस्तावानुसार प्रकल्प संचालक आत्मा यांनी देय अनुदान रक्कम शेतकरी उत्पादक कंपनीस बँक खात्यामार्फत वर्ग करावी.

**९. बैठक व्यवस्था ( टेबल, खुर्च्या, सतरंजी, फर्निचर इ.) - (एकुण रक्कम रु. ५०,०००/- फक्त एकदा)**

शेतकरी उत्पादक कंपनीचे (FPC) कार्यालयासाठी कार्यालयीन फर्निचर उदा. टेबल खुर्च्या, कपाट व इतर फर्निचर तसेच बैठक व प्रशिक्षणासाठी सतरंजी इत्यादी साहित्य खरेदीसाठी प्रकल्प कालावधीत फक्त एकदाच रक्कम रुपये रु. ५०,०००/- च्या मर्यादेत अनुदान देय राहील. तथापि, तत्पूर्वी शेतकरी उत्पादक कंपनीने कार्यालय भाडे तत्वावर घेणेबाबतची कार्यवाही पूर्ण केलेली असावी.

शेतकरी उत्पादक कंपनीने विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून खरेदी प्रक्रिया त्यांचे स्तरावरून पूर्ण करावी. खरेदी प्रक्रिया पुर्ण झालेनंतर शेतकरी उत्पादक कंपनीने खरेदीच्या मुळ देयकांसह अनुदान मागणी प्रस्ताव प्रकल्प संचालक आत्मा यांना सादर करावा. प्राप्त प्रस्तावानुसार प्रकल्प संचालक आत्मा यांनी देय अनुदान रक्कम शेतकरी उत्पादक कंपनीस बँक खात्यामार्फत वर्ग करावी.

**१०. संगणक संच, प्रिंटर-** (एकूण **रक्कम रु. ७०,०००/- फक्त एकदा**)

शेतकरी उत्पादक कंपनीचे (FPC) कार्यालयाचे कामकाजासाठी संगणक संच, प्रिंटर इ. बाबींसाठी प्रकल्प कालावधीत एकदाच द्यावयाचे अनुदान रक्कम रु. ७०,०००/- च्या मर्यादेत देय राहील. तथापि तत्पूर्वी शेतकरी उत्पादक कंपनीने भाडे तत्वावर कार्यालय घेण्याची कार्यवाही पूर्ण केलेली असावी.

शेतकरी उत्पादक कंपनीने विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून खरेदी प्रक्रिया त्यांचे स्तरावरून पूर्ण करावी. संगणक संच व प्रिंटर यांची खरेदी नामांकित कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून करावी. यासाठी बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या नविनतम आवृत्तीची (Latest Version) निवड करावी. खरेदी प्रक्रिया पुर्ण झालेनंतर शेतकरी उत्पादक कंपनीने खरेदीच्या मुळ देयकांसह अनुदान मागणी प्रस्ताव प्रकल्प संचालक आत्मा यांना सादर करावा. प्राप्त प्रस्तावानुसार प्रकल्प संचालक आत्मा यांनी देय अनुदान रक्कम शेतकरी उत्पादक कंपनीस बँक खात्यामार्फत वर्ग करावी.

**११. सचिवाचे मानधन ( मोबाइल व इंटरनेट सुविधेसह )-**

**(प्रति महा रु. ५०००/- प्रमाणे ३६ महिन्यासाठी एकुण रक्कम रु. १,८०,०००/-)**

शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) कार्यालयाचे कामकाज नियमितपणे व कार्यक्षमतेने पाहणेसाठी वरील मुद्दा क्र. २ नुसार सचिवाची नेमणूक करण्यात यावी. यासाठी नेमणुक केलेल्या व्यक्तीस दरमहा मानधन रक्कम रु. ५०००/- (मोबाइल व इंटरनेट खर्चासह ) देय राहील. सदर रक्कम शेतकरी उत्पादक कंपनीने प्रथम अदा करावी. त्यानंतर तिमाही अनूदान मागणी प्रस्ताव प्रकल्प संचालक आत्मा यांचेकडे सादर करावा. प्राप्त प्रस्तावानुसार प्रकल्प संचालक आत्मा यांनी देय अनुदान रक्कम शेतकरी उत्पादक कंपनीस बँक खात्यामार्फत वर्ग करावी.

**१२. कार्यालयीन खर्च ( स्टेशनरी, सफाई, प्रवास खर्च इ.) - प्रति महा रु. ५०००/-प्रमाणे**

**(३६ महिन्यासाठी एकुण रक्कम रु. १,८०,०००/- )**

शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) कार्यालयाचे कामकाजासाठी स्टेशनरी खरेदी, बैठकीसाठी चहापान, कार्यालयीन साफसफाई तसेच सचिव / संचालकांच्या कार्यक्षेत्राबाहेरील प्रवास यासाठी दरमहा रक्कम रु. ५०००/- चे मर्यादेत शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) ला अनुदान देय राहील. सदरचा खर्च प्रथम शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) पातळीवरुन करावा. शेतकरी उत्पादक

कंपनीने (FPC) प्रत्येक ३ महिन्यानंतर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाप्रमाणे प्रकल्प संचालक, आत्मा यांचेकडे अनुदान मागणी प्रस्ताव सादर करावा. प्राप्त प्रस्तावानुसार प्रकल्प संचालक आत्मा यांनी देय अनुदान रक्कम शेतकरी उत्पादक कंपनीस बँक खात्यामार्फत वर्ग करावी.

**उपरोक्त पद्धतीने केवळ कंपन्या स्थापन करुन न थांबता शेतकरी उत्पादक कंपनीने खालील बाबी हाती घेणे आवश्यक आहे.-**

- शेतीच्या उत्पादनावर होणारा खर्च कमी होणेसाठी आणि दर्जेदार,उच्च गुणवत्तेच्या कृषि निविष्ठा व अन्य तंत्रज्ञान भागधारक शेतक-यांना उपलब्ध करुन देणेसाठी कृषि सेवा केंद्र व तत्सम व्यवसाय शेतकरी उत्पादक कंपनीने सुरु करावा.
- कृषि यांत्रिकीकरणासाठी औजारे बँका, प्राथमिक प्रक्रिया केंद्र इ. व्यवसाय सुरु करावेत.
- भागधारक शेतकऱ्यांमार्फत उत्पादित शेतमालाच्या पर्यायी मुल्यसाखळ्या सुरु करणेसाठी विविध योजनांच्या अभिसरणातुन मुल्यसाखळी विकासाचे प्रकल्प राबवावेत. ( स्मार्ट, मॅग्नेट, गटशेती, पोक्रा, सेंद्रीय शेती, PMFME, MIDH, मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजना,MSAMB,इ.)
- भागधारक व परिसरातील अन्य शेतक-यांना पर्यायी बाजार उपलब्ध करुन देणेसाठी थेट पणन परवाना काढावा आणि विविध संस्थात्मक खरेदीदारासोबत करार (उदा.MCX, e-NAM इ.) करावेत.
- **आत्मा (ATMA), प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा ( PIA), पाणलोट विकास समिती (WDC),पाणलोट विकास चमु ( WDT) यांचा समन्वय-**

प्रकल्प क्षेत्रात शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्या कोठे स्थापन करावेत, त्यांचे सदस्य कोण असावेत याबाबत पाणलोट विकास समिती (WDC) मध्ये चर्चा करुन निर्णय घ्यावा आणि याबाबतचे निर्णय प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (PIA) यांचेमार्फत संबंधित प्रकल्प संचालक आत्मा यांना कळविण्यात यावे. तद्नंतर प्रकल्प संचालक आत्मा यांनी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (PIA) यांचेमार्फत पाणलोट विकास चमु (WDT) च्या मदतीने निवड केलेल्या पाणलोट क्षेत्रात शेतक-यांचे गट स्थापन करणे, गटांना एकत्रीत आणुन त्यांची कंपनी स्थापन करणे यासाठी आवश्यक ती कार्यवाही या मार्गदर्शक सुचनामध्ये यापुर्वी विषद केल्यानुसार करावी.

१. **प्रशासकीय खर्च** - प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या बाबीकरिता आत्मा संस्थेस प्रकल्प व्यवस्थापनासाठी प्रशासकीय शुल्क प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा (IA) म्हणुन कृषि संचालक आत्मा यांचे स्तरावर उपलब्ध करून देण्यात यावे. जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक आत्मा यांना खर्चाच्या प्रमाणात त्यांचे मागणीनुसार प्रशासकीय खर्चासाठी आवश्यक निधी कृषि संचालक आत्मा उपलब्ध करुन देतील.

## संनियंत्रण व मुल्यमापन

या घटकाच्या सनियंत्रण मुल्यमापनासाठी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या यंत्रणेमार्फत कार्यवाही केली जाईल. अधिकारीनिहाय करावयाच्या तपासणीचे प्रमाण खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | अधिकारी | तपासणीचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | प्रकल्प उपसंचालक आत्मा, (प्रकल्प संचालक, आत्मा यांचे कार्यालयातील) | जिल्ह्यात स्थापित एकुण शेतकरी उत्पादक कंपन्यांपैकी किमान ५० टक्के कंपन्या |
| २ | प्रकल्प संचालक आत्मा | जिल्ह्यात स्थापित एकुण शेतकरी उत्पादक कंपन्यांपैकी किमान ५० टक्के कंपन्या ( परंतु, प्रकल्प उपसंचालक,आत्मा यांनी तपासलेल्या पेक्षा वेगळ्या कंपन्या ) |
| ३ | अधिक्षक कृषि अधिकारी वि.कृ स. स. कार्यालय | विभागातील प्रत्येक जिल्ह्यातुन किमान १ कंपनी |
| ४ | विभागीय कृषि सहसंचालक | विभागातील किमान २ कंपन्या |

प्रपत्र "अ"

Watershed Development Component Of Pradhan Mantri Krishi Sinchan Yojana -2.0 ( WDC-PMKSY-2.0) Formation of FPO Under Entry Point Activity ( EPA ) by ATMA

| Sr no | Project Name (proposed) | Name of Blocks | No. of Villages | No.of GPs | Project area praposed for treatment (in Ha) | Total project cost (Rs Lakh) | Name of PIA/department | EPA Cost @ 2% Rs. In Lakhs |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 | 6 | 7 | 8 | 10 | 9 |
| 1 | Thane (WDC-2.0)/1/2021-22 | Sahapur | 9 | 5 | 3471.34 | 763.69 | TAO Sahapur | 15.27 |
| | 1 | II List | | | 3471 | 764 | | 15.27 |
| 2 | Palghar (WDC-2.0)/1/ 2021-22 | Palghar | 18 | 14 | 5364.15 | 1180.113 | TAO Palghar | 23.60 |
| 3 | Palghar (WDC-2.0)/2/ 2021-22 | Wada | 16 | 16 | 4442.3 | 977.306 | TAO Wada | 19.55 |
| 4 | Palghar (WDC-2.0)/3/ 2021-22 | Palghar | 17 | 13 | 5608.96 | 1233.9712 | TAO Palghar | 24.68 |
| 5 | Palghar (WDC-2.0)/4/ 2021-22 | Talasari | 16 | 14 | 5481.77 | 1205.9894 | TAO TALASARI | 24.12 |
| 6 | Palghar (WDC-2.0)/ 5/ 2021-22 | Palghar | 27 | 15 | 5411.55 | 1190.541 | TAO Palghar | 23.81 |
| 7 | Palghar (WDC-2.0)/6/ 2021-22 | Dahanu | 23 | 13 | 3926.27 | 863.7794 | TAO Dahanu | 17.28 |
| | 6 | I List | 117 | 85 | 30235 | 6652 | | 133.03 |
| 8 | Palghar (WDC-2.0)/7/2021-22 | Dahanu | 15 | 9 | 3827.35 | 842.02 | TAO Dahanu | 16.84 |
| 9 | Palghar (WDC-2.0)/8/2021-22 | Dahanu | 23 | 14 | 4945.44 | 1088.00 | TAO Dahanu | 21.76 |
| | 2 | II List | 38 | 23 | 8772.79 | 1930.01 | | 38.60 |
| 10 | Raigad (WDC-2.0)/1/2021-22 | Roha | 20 | 7 | 5236.34 | 1466 | TAO Roha | 29.32 |
| 11 | Raigad (WDC-2.0)/2/2021-22 | Roha | 11 | 3 | 3825.00 | 1071.00 | TAO Roha | 21.42 |
| 12 | Raigad (WDC-2.0)/3/2021-22 | Murud jangira | 16 | 5 | 2540.00 | 711.20 | TAO Murud | 14.22 |
| 13 | Raigad (WDC-2.0)/4/2021-22 | Mangaon | 32 | 12 | 4115.93 | 1152.46 | TAO Mangaon | 23.05 |
| 14 | Raigad (WDC-2.0)/5/2021-22 | Mangaon | 30 | 16 | 4913.37 | 1375.74 | TAO Mangaon | 27.51 |
| 15 | Raigad (WDC-2.0)/6/2021-22 | Mangaon | 50 | 17 | 5494.94 | 1538.58 | TAO Mangaon | 30.77 |
| 16 | Raigad (WDC-2.0)/7/2021-22 | Mangaon | 47 | 26 | 5342.45 | 1495.89 | TAO Mangaon | 29.92 |
| 17 | Raigad (WDC-2.0)/8/2021-22 | Alibag | 26 | 9 | 3880.00 | 1086.40 | TAO Alibag | 21.73 |
| 18 | Raigad (WDC-2.0)/9/2021-22 | Pen | 12 | 7 | 3657.69 | 1024.15 | TAO Pen | 20.48 |
| 19 | Raigad (WDC-2.0)/10/2021-22 | Tala | 14 | 7 | 3315.40 | 928.31 | TAO Tala | 18.57 |
| | 10 | II List | 258 | 109 | 42321 | 11850 | | 237.00 |
| 20 | Ratnagiri (WDC-2.0)/1/ 2021-22 | Lanja | 17 | 7 | 3060 | 375 | TAO Lanja | 7.50 |
| 21 | Ratnagiri (WDC-2.0)/2/ 2021-22 | Mandangad | 12 | 7 | 3193 | 894 | TAO Mandangad | 17.88 |
| | 2 | I List | 29 | 14 | 6253 | 1269 | | 25.38 |
| 22 | Ratnagiri (WDC-2.0)/3/2021-22 | Chiplun | 9 | 7 | 2548.00 | 713.44 | TAO Chiplun | 14.27 |
| 23 | Ratnagiri (WDC-2.0)/4/2021-22 | Chiplun | 10 | 8 | 5180.07 | 1450.42 | TAO Chiplun | 29.01 |
| 24 | Ratnagiri (WDC-2.0)/5/2021-22 | Guhagar | 11 | 6 | 4937.57 | 1382.52 | TAO Guhaghar | 27.65 |
| 25 | Ratnagiri (WDC-2.0)/6/2021-22 | Guhagar | 13 | 7 | 3821.73 | 1070.08 | TAO Guhaghar | 21.40 |
| 26 | Ratnagiri (WDC-2.0)/7/2021-22 | Guhagar | 12 | 6 | 4124.03 | 1154.73 | TAO Guhaghar | 23.09 |
| 27 | Ratnagiri (WDC-2.0)/8/2021-22 | Rajapur | 7 | 3 | 3879.55 | 1086.27 | TAO Rajapur | 21.73 |
| 28 | Ratnagiri (WDC-2.0)/9/2021-22 | Ratnagiri | 14 | 7 | 3760.00 | 1052.80 | TAO Ratnagiri | 21.06 |
| | 7 | II List | 76 | 44 | 28250.95 | 7910.27 | | 158.21 |
| 29 | Sindhudurga (WDC-2.0)/1/ 2021-22 | Dodamarga | 5 | 5 | 3740.85 | 1047.44 | TAO Dodamarg | 20.95 |
| 30 | Sindhudurga (WDC-2.0)/2/ 2021-22 | Dodamarga | 3 | 1 | 4341.35 | 1215.58 | CAO Dodamarg | 24.31 |
| 31 | Sindhudurga (WDC-2.0)/3/ 2021-22 | Dodamarga | 5 | 5 | 3604.40 | 1009.23 | TAO Dodamarg | 20.18 |
| 32 | Sindhudurga (WDC-2.0)/4/ 2021-22 | Dodamarga | 8 | 5 | 4566.86 | 1278.72 | CAO Dodamarg | 25.57 |
| 33 | Sindhudurga (WDC-2.0)/5/ 2021-22 | Dodamarga | 9 | 6 | 4450.34 | 1246.10 | TAO Dodamarg | 24.92 |
| 34 | Sindhudurga (WDC-2.0)/6/ 2021-22 | Vaibhavwadi | 9 | 6 | 3124.24 | 874.79 | TAO Vaibhavwadi | 17.50 |
| 35 | Sindhudurga (WDC-2.0)/7/ 2021-22 | Vaibhavwadi | 7 | 3 | 3236.64 | 906.26 | TAO Vaibhavwadi | 18.13 |
| 36 | Sindhudurga (WDC-2.0)/8/ 2021-22 | Dodamarga | 4 | 4 | 4552.93 | 1274.82 | CAO Dodamarg | 25.50 |
| 37 | Sindhudurga (WDC-2.0)/9/ 2021-22 | Dodamarga | 6 | 5 | 3166.96 | 886.75 | CAO Dodamarg | 17.73 |

| Sr no | Project Name (proposed) | Name of Blocks | No. of Villages | No.of GPs | Project area praposed for treatment (in Ha) | Total project cost (Rs Lakh) | Name of PIA/department | EPA Cost @ 2% Rs. In Lakhs |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 | 6 | 7 | 8 | 10 | 9 |
| | 9 | I List | 56 | 40 | 34785 | 9740 | | 194.79 |
| 38 | Nashik (WDC-2.0)/1/ 2021-22 | Satana | 9 | 9 | 3390.00 | 949.20 | CAO Nampur | 18.98 |
| 39 | Nashik (WDC-2.0)/2/ 2021-22 | Dindori | 7 | 4 | 2488.24 | 696.71 | TAO Dindori | 13.93 |
| 40 | Nashik (WDC-2.0)/3/ 2021-22 | Malegaon | 7 | 5 | 2760.49 | 772.94 | TAO Malegaon | 15.46 |
| | 3 | I List | 23 | 18 | 8638.73 | 2418.84 | | 48.38 |
| 41 | Jalgaon (WDC-2.0)/1/ 2021-22 | Amalner | 16 | 14 | 3898.08 | 857.58 | TAO Amalner | 17.15 |
| 42 | Jalgaon (WDC-2.0)/2/ 2021-22 | Palora | 14 | 10 | 4208.67 | 925.91 | TAO Parola | 18.52 |
| 43 | Jalgaon (WDC-2.0)/3/ 2021-22 | Pachora | 9 | 4 | 2514.00 | 553.08 | TAO Pachora | 11.06 |
| | 3 | I List | 39 | 28 | 10620.75 | 2336.57 | | 46.73 |
| 44 | Jalgaon (WDC-2.0)/4/2021-22 | Jamner | 17 | 16 | 2929.00 | 644.38 | CAO Pahur | 12.89 |
| 45 | Jalgaon (WDC-2.0)/5/2021-22 | Jalgaon | 8 | 8 | 2629.00 | 578.38 | CAO Jalgaon | 11.57 |
| | 2 | II List | 25 | 24 | 5558 | 1223 | | 24.46 |
| 46 | Nandurbar (WDC-2.0)/1/ 2021-22 | Taloda | 18 | 3 | 4677 | 1029 | TAO Taloda | 20.58 |
| 47 | Nandurbar (WDC-2.0)/2/ 2021-22 | Akkalkua | 17 | 4 | 5736 | 1262 | TAO Akkalkua | 25.24 |
| 48 | Nandurbar (WDC-2.0)/3/ 2021-22 | Akrani | 10 | 6 | 3114 | 685 | TAO Akrani | 13.70 |
| 49 | Nandurbar (WDC-2.0)/4/ 2021-22 | Nandurbar | 14 | 14 | 3533 | 777 | TAO Nandurbar | 15.55 |
| | 4 | I List | 59 | 27 | 17061 | 3753 | | 75.07 |
| 50 | Pune (WDC-2.0)/1/ 2021-22 | Khed | 11 | 4 | 6056 | 1696 | TAO Khed | 33.91 |
| | 1 | I List | 11 | 4 | 6056 | 1696 | | 33.91 |
| 51 | Ahmednagar (WDC-2.0)/1/2021-22 | AKOLE | 9 | 9 | 5160.51 | 1135.31 | TAO Akole | 22.71 |
| 52 | Ahmednagar (WDC-2.0)/2/2021-22 | Pathardi | 6 | 3 | 2810.00 | 618.20 | CAO Taklimanur | 12.36 |
| 53 | Ahmednagar (WDC-2.0)/3/2021-22 | Shevgaon | 7 | 7 | 4086.76 | 899.09 | CAO Chapadgaon | 17.98 |
| 54 | Ahmednagar (WDC-2.0)/4/2021-22 | AKOLE | 6 | 3 | 5034.55 | 1107.60 | CAO Kotul | 22.15 |
| 55 | Ahmednagar (WDC-2.0)/5/2021-22 | Akole | 4 | 4 | 3331.61 | 732.95 | CAO Akole | 14.66 |
| 56 | Ahmednagar (WDC-2.0)/6/2021-22 | AKOLE | 5 | 4 | 5666.65 | 1246.66 | TAO Akole | 24.93 |
| 57 | Ahmednagar (WDC-2.0)/7/2021-22 | Pathardi | 4 | 4 | 3510.00 | 772.20 | CAO Karanji | 15.44 |
| | 7 | II List | 41 | 34 | 29600 | 6512 | | 130.24 |
| 58 | Solapur (WDC-2.0)/1/ 2021-22 | Madha | 7 | 7 | 3801 | 836 | TAO Madha | 16.73 |
| 59 | Solapur (WDC-2.0)/2/ 2021-22 | Mangalwedha | 7 | 7 | 4198 | 924 | TAO Mangalwedha | 18.47 |
| | 2 | I List | 14 | 14 | 8000 | 1760 | | 35.20 |
| 60 | Solapur (WDC-2.0)/3/2021-22 | Madha | 6 | 5 | 4344.83 | 955.86 | TAO Madha | 19.12 |
| 61 | Solapur (WDC-2.0)/4/2021-22 | Sangola | 5 | 5 | 2641.94 | 581.23 | TAO Sangola | 11.62 |
| | 2 | II List | 11 | 10 | 6986.77 | 1537.09 | | 30.74 |
| 62 | Sangli (WDC-2.0)/1/2021-22 | Jath | 3 | 3 | 4000.00 | 880.00 | CAO Jat | 17.60 |
| 63 | Sangli (WDC-2.0)/2/2021-22 | Jath | 3 | 3 | 5000.00 | 1100.00 | CAO Jat | 22.00 |
| 64 | Sangli (WDC-2.0)/3/2021-22 | Jath | 4 | 4 | 3200.00 | 704.00 | CAO Umadi | 14.08 |
| 65 | Sangli (WDC-2.0)/4/2021-22 | Jath | 2 | 2 | 3200.00 | 704.00 | CAO Jat | 14.08 |
| | 4 | II List | 12 | 12 | 15400.00 | 3388.00 | | 67.76 |
| 66 | Aurangabad (WDC-2.0)/1/ 2021-22 | Khultabad | 7 | 5 | 4276.00 | 940.72 | TAO Khutabad | 18.81 |
| 67 | Aurangabad (WDC-2.0)/2/ 2021-22 | Khultabad | 7 | 5 | 2973.00 | 654.06 | TAO Khutabad | 13.08 |
| 68 | Aurangabad (WDC-2.0)/3/ 2021-22 | Vaijapur | 11 | 10 | 3492.50 | 768.35 | TAO Vaijapur | 15.37 |
| | 3 | I List | 25 | 20 | 10741.50 | 2363.13 | | 47.26 |
| 69 | Aurangabad (WDC-2.0)/4 /2021-22 | Aurangabad | 10 | 8 | 2500 | 550.00 | TAO Aurangabad | 11.00 |
| 70 | Aurangabad (WDC-2.0)/5/2021-22 | Gangapur | 15 | 10 | 3976.00 | 874.72 | TAO Gangapur | 17.49 |
| 71 | Aurangabad (WDC-2.0)/6/2021-22 | Paithan | 9 | 8 | 2748.00 | 604.56 | TAO Paithan | 12.09 |
| 72 | Aurangabad (WDC-2.0)/7/2021-22 | Vaijapur | 6 | 6 | 2589.00 | 569.58 | TAO Vaipur | 11.39 |
| | 4 | II List | 40 | 32 | 11813.00 | 2598.86 | | 51.98 |

| Sr no | Project Name (proposed) | Name of Blocks | No. of Villages | No.of GPs | Project area praposed for treatment (in Ha) | Total project cost (Rs Lakh) | Name of PIA/department | EPA Cost @ 2% Rs. In Lakhs |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 | 6 | 7 | 8 | 10 | 9 |
| 73 | Beed (WDC-2.0)/1/ 2021-22 | Ashti | 5 | 5 | 2968.00 | 652.96 | TAO Asthi | 13.06 |
| | 1 | I List | 5 | 5 | 2968.00 | 652.96 | | 13.06 |
| 74 | Beed (WDC-2.0)/2/2021-22 | Beed | 9 | 4 | 4545.00 | 999.90 | TAO Beed | 20.00 |
| 75 | Beed (WDC-2.0)/3/2021-22 | Georai | 4 | 4 | 4512.00 | 992.64 | TAO Georai | 19.85 |
| | 2 | II List | 13 | 8 | 9057.00 | 1992.54 | | 39.85 |
| 76 | Jalna (WDC-2.0)/01/2021-22 | Ambad | 8 | 6 | 2667.95 | 586.95 | TAO Ambad | 11.74 |
| 77 | Jalna (WDC-2.0)/02/2021-22 | Jafrabad | 7 | 6 | 2500.00 | 550.00 | TAO Jafrabad | 11.00 |
| | 2 | II List | 15 | 12 | 5167.95 | 1136.95 | | 22.74 |
| 78 | Latur (WDC-2.0)/1/ 2021-22 | Nilanga | 6 | 6 | 2954.00 | 649.88 | TAO Nilanga | 13.00 |
| 79 | Latur (WDC-2.0)/2/ 2021-22 | Udagir | 8 | 8 | 4180.00 | 919.60 | TAO Udgir | 18.39 |
| 80 | Latur (WDC-2.0)/3/ 2021-22 | Ausa | 8 | 8 | 5300.00 | 1166.00 | TAO Ausa | 23.32 |
| | 3 | I List | 22 | 22 | 12434.00 | 2735.48 | | 54.71 |
| 81 | Osmanabad (WDC-2.0)/1/ 2021-22 | Kalam | 3 | 3 | 2500.00 | 550.00 | TAO Kalam | 11.00 |
| | 1 | I List | 3 | 3 | 2500.00 | 550.00 | | 11.00 |
| 82 | Osmanabad (WDC-2.0) /2 / 2021-22 | Tuljapur | 12 | 12 | 3175.00 | 698.50 | TAO Tuljapur | 13.97 |
| 83 | Osmanabad (WDC-2.0) /3/ 2021-22 | Tuljapur | 10 | 10 | 3380.00 | 743.60 | TAO Tuljapur | 14.87 |
| 84 | Osmanabad (WDC-2.0) /4/ 2021-22 | Osmanabad | 1 | 1 | 2559.00 | 562.98 | TAO Osmanabad | 11.26 |
| 85 | Osmanabad (WDC-2.0) /5 / 2021-22 | Osmanabad | 7 | 7 | 2576.00 | 566.72 | TAO Osmanabad | 11.33 |
| 86 | Osmanabad (WDC-2.0) /6/ 2021-22 | Tuljapur | 3 | 3 | 4446.00 | 978.12 | TAO Tuljapur | 19.56 |
| | 5 | II List | 33 | 33 | 16136.00 | 3549.92 | | 71.00 |
| 87 | Parbhani (WDC-2.0)/1/2021-22 | Gangakhed | 7 | 7 | 3290.00 | 723.80 | TAO Gangakhed | 14.48 |
| 88 | Parbhani (WDC-2.0)/2/2021-22 | Jintur | 16 | 16 | 5378.00 | 1183.16 | TAO Jintur | 23.66 |
| 89 | Parbhani (WDC-2.0)/3/2021-22 | Gangakhed | 9 | 5 | 3791.00 | 834.02 | TAO Gangakhed | 16.68 |
| | 3 | II List | 32 | 28 | 12459.00 | 2740.98 | | 54.82 |
| 90 | Hingoli (WDC-2.0)/1/2021-22 | KALAMNURI | 16 | 16 | 6898.00 | 1517.56 | TAO Kalmnuri | 30.35 |
| 91 | Hingoli (WDC-2.0)/2/2021-22 | KALAMNURI | 10 | 10 | 4891.00 | 1076.02 | TAO Kalmnuri | 21.52 |
| 92 | Hingoli (WDC-2.0)/3/2021-22 | Shengaon | 13 | 13 | 5799.69 | 1275.93 | TAO Sengaon | 25.52 |
| | 3 | II List | 39 | 39 | 17589 | 3870 | | 77.39 |
| 93 | Naded (WDC-2.0)/1/ 2021-22 | Bhokar | 9 | 9 | 5873 | 1292 | TAO Bhokar | 25.84 |
| 94 | Naded (WDC-2.0)/2/ 2021-22 | Deglur | 11 | 10 | 4723 | 1039 | CAO Deglur | 20.78 |
| | 2 | I List | 20 | 19 | 10596 | 2331 | | 46.62 |
| 95 | Nanded (WDC-2.0)/3/2021-22 | Kinwat | 6 | 3 | 3147.15 | 692.37 | TAO Kinwat | 13.85 |
| 96 | Nanded (WDC-2.0)/4/2021-22 | Kinwat | 8 | 5 | 4013.94 | 883.07 | TAO Kinwat | 17.66 |
| | 2 | II List | 14 | 8 | 7161.09 | 1575.44 | | 31.51 |
| 97 | Amravati (WDC-2.0)/1/ 2021-22 | Nandgaon khandeshwar | 7 | 5 | 4355.50 | 958.21 | TAO Nandgaon khandeshwar | 19.16 |
| | 1 | I List | 7 | 5 | 4355.50 | 958.21 | | 19.16 |
| 98 | Amravati(WDC-2.0)/2/2021-22 | Dharni | 11 | 11 | 2728.85 | 600.35 | TAO Dharni | 12.01 |
| 99 | Amravati (WDC-2.0)/3/2021-22 | Chandur Railway | 3 | 3 | 2590.00 | 569.80 | TAO Chandur Railway | 11.40 |
| | 2 | II List | 14 | 14 | 5318.85 | 1170.15 | | 23.40 |
| 100 | Buldhana (WDC-2.0)/1/ 2021-22 | Deulgaonraja | 13 | 13 | 4904.85 | 1079.07 | TAO Deulgaonraja | 21.58 |
| 101 | Buldhana (WDC-2.0)/2/ 2021-22 | Chikhali | 6 | 4 | 3784.18 | 832.52 | TAO Chikhali | 16.65 |
| 102 | Buldhana (WDC-2.0)/3/ 2021-22 | Lonar | 4 | 3 | 2498.59 | 549.69 | CAO Bibi | 10.99 |
| | 3 | I List | 23 | 20 | 11187.62 | 2461.28 | | 49.23 |
| 103 | Buldhana (WDC-2.0)/4/2021-22 | Mehakar | 7 | 6 | 2506.87 | 551.51 | TAO Mehakar | 11.03 |
| 104 | Buldhana (WDC-2.0)/5/2021-22 | Khamgaon | 3 | 3 | 2683.83 | 590.44 | TAO Khamgaon | 11.81 |
| 105 | Buldhana (WDC-2.0)/6/2021-22 | Buldhana | 1 | 1 | 2534.00 | 557.48 | TAO Buldhana | 11.15 |
| | 3 | II List | 11 | 10 | 7725 | 1699 | | 33.99 |

| Sr no | Project Name (proposed) | Name of Blocks | No. of Villages | No.of GPs | Project area praposed for treatment (in Ha) | Total project cost (Rs Lakh) | Name of PIA/department | EPA Cost @ 2% Rs. In Lakhs |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 | 6 | 7 | 8 | 10 | 9 |
| 106 | Akola (WDC-2.0)/1/ 2021-22 | Barshitakli | 8 | 6 | 4898 | 1078 | TAO Barshritakli | 21.55 |
| 107 | Akola (WDC-2.0)/2/ 2021-22 | Akola | 3 | 3 | 5150 | 1133 | TAO Akola | 22.66 |
| 108 | Akola (WDC-2.0)/3/ 2021-22 | Murtizapur | 14 | 4 | 5339 | 1174 | TAO Murtizapur | 23.49 |
| | 3 | I List | 25 | 13 | 15387 | 3385 | | 67.70 |
| 109 | Akola (WDC-2.0)/4/2021-22 | Balapur | 7 | 6 | 2550.00 | 561.00 | TAO Balapur | 11.22 |
| 110 | Akola (WDC-2.0)/5/2021-22 | Telara | 11 | 5 | 3142.00 | 691.24 | TAO Telara | 13.82 |
| 111 | Akola (WDC-2.0)/6/2021-22 | Patur | 8 | 4 | 4762.45 | 1047.74 | TAO Patur | 20.95 |
| | 3 | II List | 26 | 15 | 10454.45 | 2299.98 | | 46.00 |
| 112 | Washim (WDC-2.0)/1/ 2021-22 | Mangalurpir | 6 | 3 | 4312.06 | 948.65 | TAO Mangarulpir | 18.97 |
| 113 | Washim (WDC-2.0)/2/ 2021-22 | Karanja | 11 | 8 | 4029.18 | 886.42 | TAO Karanja | 17.73 |
| 114 | Washim (WDC-2.0)/3/ 2021-22 | Washim | 5 | 3 | 3332.26 | 733.10 | TAO Washim | 14.66 |
| 115 | Washim (WDC-2.0)/4/ 2021-22 | Risod | 5 | 5 | 5626.05 | 1237.73 | TAO Risod | 24.75 |
| 116 | Washim (WDC-2.0)/5/ 2021-22 | Malegaon | 8 | 6 | 3806.19 | 837.36 | TAO Malegaon | 16.75 |
| | 5 | I List | 35 | 25 | 21105.74 | 4643.26 | | 92.87 |
| 117 | Washim (WDC-2.0)/6/2021-22 | Manora | 5 | 5 | 5756.00 | 1266.32 | TAO manora | 25.33 |
| 118 | Washim (WDC-2.0)/7/2021-22 | Risod | 7 | 6 | 4276.00 | 940.72 | TAO Risode | 18.81 |
| | 2 | II List | 12 | 11 | 10032 | 2207 | | 44.14 |
| 119 | Yavatmal (WDC-2.0)/1/ 2021-22 | Ghatangi/Yav atmal | 7 | 4 | 3486 | 767 | TAO Ghtangi | 15.34 |
| 120 | Yavatmal (WDC-2.0)/2/ 2021-22 | Digrus | 12 | 4 | 3924 | 863 | TAO Digraus | 17.27 |
| 121 | Yavatmal (WDC-2.0)/3/ 2021-22 | Digrus | 6 | 4 | 3864 | 850 | TAO Digraus | 17.00 |
| | 3 | I List | 25 | 12 | 11274 | 2480 | | 49.61 |
| 122 | Wardha (WDC-2.0)/1/ 2021-22 | Selu | 11 | 7 | 3023 | 665 | CAO Seloo | 13.30 |
| 123 | Wardh (WDC-2.0)/2/ 2021-22 | Samudrapur | 12 | 6 | 3093 | 680 | CAO Gird | 13.61 |
| | 2 | I List | 23 | 13 | 6116 | 1345 | | 26.91 |
| 124 | Wardha (WDC-2.0)/3/2021-22 | Seloo | 7 | 4 | 2657.54 | 584.66 | TAO Seloo | 11.69 |
| 125 | Wardha (WDC-2.0)/4/2021-22 | Seloo | 13 | 7 | 3782.22 | 832.09 | TAO Seloo | 16.64 |
| | 2 | II List | 20 | 11 | 6439.76 | 1416.75 | | 28.33 |
| 126 | Gondiya (WDC-2.0)/1/ 2021-22 | Amgaon | 18 | 18 | 4631.95 | 1296.95 | TAO Amgoan | 25.94 |
| 127 | Gondiya (WDC-2.0)/2/ 2021-23 | Salekasa | 25 | 13 | 3126.00 | 875.28 | TAO Salekasa | 17.51 |
| | 2 | I List | 43 | 31 | 7757.95 | 2172.23 | | 43.44 |
| 128 | Gondia (WDC-2.0)/ 3 /2021-22 | Salekasa | 30 | 19 | 4511.61 | 1263.25 | TAO Salekasa | 25.27 |
| 129 | Gondia (WDC-2.0)/4/2021-22 | Deori | 9 | 4 | 3812.61 | 1067.53 | TAO Deori | 21.35 |
| 130 | Gondia (WDC-2.0)/5/2021-22 | Deori | 17 | 4 | 4476.83 | 1253.51 | TAO Deori | 25.07 |
| | 3 | II List | 56 | 27 | 12801 | 3584.29 | | 71.69 |
| 131 | Bhandra (WDC-2.0)/ 1 /2021-22 | Tumsar | 11 | 6 | 3915.84 | 861.48 | CAO Sihora | 17.23 |
| 132 | Bhandra (WDC-2.0)/ 2 /2021-22 | Tumsar | 13 | 10 | 4263.25 | 937.92 | TAO Tumsar | 18.76 |
| | 2 | II List | 24 | 16 | 8179.09 | 1799.40 | | 35.99 |
| 133 | Chandrapur (WDC-2.0)/1/ 2021-22 | Jivati | 10 | 7 | 4329.74 | 952.54 | TAO Jivati | 19.05 |
| 134 | Chandrapur (WDC-2.0)/2/ 2021-22 | Warora | 8 | 4 | 2664.08 | 586.10 | TAO Warora | 11.72 |
| | 2 | I List | 18 | 11 | 6993.82 | 1538.64 | | 30.77 |
| 135 | Chandrapur (WDC-2.0)/ 3/2021-22 | Sindhevahi | 7 | 4 | 3545.06 | 779.91 | TAO Sindhevahi | 15.60 |
| 136 | Chandrapur (WDC-2.0)/ 4/2021-22 | Koparna | 8 | 6 | 4916.66 | 1081.67 | TAO Koparna | 21.63 |
| 137 | Chandrapur (WDC-2.0)/ 5/2021-22 | Nagbid | 14 | 9 | 4419.92 | 972.38 | TAO Nagbhid | 19.45 |
| 138 | Chandrapur (WDC-2.0)/ 6/2021-22 | Nagbid | 21 | 10 | 4049.05 | 890.79 | TAO Nagbhid | 17.82 |
| 139 | Chandrapur (WDC-2.0)/ 7/2021-22 | Jivati | 14 | 7 | 4957.45 | 1090.64 | TAO Jivati | 21.81 |
| 140 | Chandrapur (WDC-2.0)/ 8/2021-22 | Mul | 12 | 8 | 2776.00 | 610.72 | TAO Mul | 12.21 |
| | 6 | II List | 76 | 44 | 24664.14 | 5426.11 | | 108.52 |

| Sr no | Project Name (proposed) | Name of Blocks | No. of Villages | No.of GPs | Project area praposed for treatment (in Ha) | Total project cost (Rs Lakh) | Name of PIA/department | EPA Cost @ 2% Rs. In Lakhs |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 | 6 | 7 | 8 | 10 | 9 |
| 141 | Gadchiroli (WDC-2.0)/1/2021-22 | Aheri | 20 | 4 | 4062.95 | 1137.63 | TAO Aheri | 22.75 |
| 142 | Gadchiroli (WDC-2.0)/ 2/2021-22 | Etapalli | 23 | 6 | 3315.84 | 928.44 | TAO Etapalli | 18.57 |
| 143 | Gadchiroli (WDC-2.0)/ 3/2021-22 | Etapalli Kasanur | 28 | 6 | 3840.85 | 1075.44 | TAO Etapalli | 21.51 |
| 144 | Gadchiroli (WDC-2.0)/ 4/2021-22 | Sironcha | 20 | 6 | 3543.54 | 992.19 | TAO Sironcha | 19.84 |
| | 4 | II List | 91 | 22 | 14763.18 | 4133.69 | | 82.67 |
| | 61 | I List | 622 | 429 | 245065.08 | 57241.81 | | 1144.84 |
| | 83 | II List | 977 | 586 | 320121.00 | 76314.80 | | 1526.30 |
| | 144 | | 1599 | 1015 | 565186.08 | 133556.60 | | 2671.13 |